

सैतानी पेटी
प्रीती सावंत-दळवी

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

www.esahity.com
esahity@gmail.com

# सैतानी पेटी

(गूढकथासंग्रह)

लेखिका : प्रीती सावंत-दळवी

# सैतानी पेटी

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखिकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# सैतानी पेटी (गूढकथा)


## लेखिका : प्रीती सावंत-दळवी

पत्ता : बी/२०५, धुरी क्लासिक, विद्यामंदिर मार्ग, अंबाडी रोड, वसई (w) - ४०१२०२

Tel : 9867109028

Email id :- pspitu2@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.



प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ४ सप्टेंबर २०१९



©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# मनोगत:-



नमस्कार,

|| श्री गणेशाय नम: ||

मी एक नवोदित लेखिका आहे. मला वाचनाची खूपच आवड म्हणजे अगदी लहानपणापासूनच. अर्थात तो वारसा मला माझ्या आईकडून आणि आजीकडून मिळाला. त्या दोघींनाही वाचनाची खूप आवड. माझे मराठी इतके चांगले असल्याचे सगळे श्रेय मी माझ्या आजीला देते. तिच्यामुळेच माझे उच्चार आणि लेखन इतके चांगले आहे.

मी मराठी माध्यमातून शिकल्यामुळे मराठी विषय हा नेहमीच जवळचा. मला गद्य भाग जास्त आवडायचा. कोणताही धडा वाचताना त्याआधी तो धडा ज्या पुस्तकातून घेतला आहे त्या पुस्तकाचे नाव आणि लेखकाचे नाव हे दोन्ही दिले जायचे. खूप वाटायचे पुढे काय असेल, ह्या कथेच्या.

असो, यानंतर जेव्हा मी महाविद्यालयात गेल्यावर वाचनालयात माझे नाव नोंदवले. त्यानंतर खऱ्या अर्थाने माझी नवनवीन पुस्तके आणि नवनवीन लेखकांशी ओळख झाली.

त्यामध्ये लेखक नारायण धारप हे नाव खूपच महत्वाचे आहे. त्यांच्या कथा, कादंबऱ्या गूढ, रहस्य, scintific विषयांवर असतात. त्यांचे एक पुस्तक, नंतर दुसरे असे करता करता मी त्यांची भरपूर पुस्तके वाचली.

त्यामुळेच कदाचित मला ही गूढ आणि रहस्यमय कथा लिहिण्याची प्रेरणा मिळाली आणि मी कथा लिहू शकले.

पण मी सगळयात जास्त आभार माझ्या नवऱ्याचे म्हणजेच मयूर दळवी यांचे करेन. कारण त्यानेच मला कथा लिहिण्यास प्रोत्साहित केले आणि त्याचबरोबर वेळोवेळी योग्य ते मार्गदर्शन ही केले. म्हणून कदाचित मी ह्या कथा लिहू शकली.

सैतानी पेटी (Dybbuk box) ह्या पुस्तकामध्ये मी लिहिलेल्या २ कथा आहेत. पहिली कथा अर्थात "सैतानी पेटी (Dybbuk box)" ही आहे दुसरी कथा "अकल्पित" अशी आहे.

सैतानी पेटी ही कथा एका इंग्रजी मूव्हीवरून प्रेरित आहे. ती एक काल्पनिक कथा असली तरीही ही पेटी जिला Dybbuk Box असे म्हटले जाते. ही पेटी अजूनही अस्तित्वात आहे. त्याबद्दल तुम्ही इंटरनेटवर search करू शकता. ह्या कथेची सुरुवात एका 80 वर्षाच्या स्टेफनी नावाच्या वृद्धेपासून होते. तिचा मुलगा रॉबर्ट ती पेटी तिला भेट म्हणून देतो. ती पेटी शापित असल्यामुळे स्टेफनीच्या आयुष्यात काय अघटित घडते? त्यानंतर ती पेटी कशाप्रकारे रिहाना नावाच्या मुलीकडे जाते आणि तिच्या आयुष्यात काय काय अमानवी अशा घटना घडतात? हे सर्व तुम्हाला वाचायला मिळेल. तसेच अकल्पित ह्या कथेत रीमा, निशा, रजत, जयराम सरपोतदार आणि गुरुजी अशी पात्रे आहेत. ही कथा रीमा आणि निशा ह्या मैत्रिणींपासून सुरू होते. रीमाला एका अमानवी शक्तीने झपाटलेले असते. तिला ह्या संकटातून तिची मैत्रीण निशा कशी सोडवते व या कार्यामध्ये तिला रजत आणि गुरुजी कसे मदत करतात? हे ही कथा वाचल्यावर नक्की कळेल.आपण या सर्व कथा वाचून आपले अभिप्राय कळवावे ही इच्छा. आपले अभिप्राय व सूचना यांचा मला पुढील लेखनासाठी उपयोग होईल अशी खात्री आहे.


मनःपुर्वक आभार.

प्रीती सावंत-दळवी.

Tel : 9867109028

Email id :- pspitu2@gmail.com

या सर्व कथा काल्पनिक आहेत.. आणि ह्याचा कोणी जिवंत या मृत व्यक्तीशी संबंध असल्यास तो केवळ योगायोग समजावा.. ही विनंती.




मी माझे पहिले पुस्तक

लेखक नारायण धारप यांना समर्पित करू इच्छिते

केवळ त्यांच्यामुळेच

मी गूढ तसेच रहस्यमय कथा लिहू शकले.

धन्यवाद.

प्रीती सावंत-दळवी

# अनुक्रम

सैतानी पेटी

अकल्पित

they leave
and act like it never happened
they come back
and act like they never left

*ghosts* - rupi kaur



# सैतानी पेटी (Dybbuk Box)



"Happy Birthday to you.. .Happy Birthday to you Mamma.. .. Happy Birthday to you" असे बोलत रॉबर्टने त्याच्या आईचा स्टेफनीचा ९० वा वाढदिवस साजरा केला आणि एका पुरातन वस्तूच्या दुकानातून घेतलेली एक पेटी तिला भेट म्हणून दिली. ती पेटी पाहताच स्टेफनी खूपच खुश झाली. ती पेटी ती उघडणार इतक्यात रॉबर्टला एक महत्वाचा फोन आला. रॉबर्टने मला एका महत्वाच्या कामासाठी बाहेर जावे लागेल आणि मी संध्याकाळ पर्यंत येईन मग आपण बाहेर जेवायला जाऊ असे सांगून तो तिथून निघून गेला.

स्टेफनी आणि रॉबर्ट अमेरिकेतील न्यूयॉर्क या शहरात राहत होते. स्टेफनीला पुरातन वस्तू साठवण्याचा छंद होता म्हणून रॉबर्ट स्टेफनीला अशा पुरातन वस्तू  नेहमी भेट म्हणून देत असे. जशी आज त्याने तिला ही पेटी दिली.

स्टेफनीला पेटी उघडायची खूपच घाई झाली होती. पण तिच्या  न्याहरीची वेळ झाल्यामुळे तिने आधी न्याहरी घेऊन मग आरामशीर ती पेटी उघडायचे ठरवले. तिने ती पेटी तिच्या खोलीच्या ड्रेसिंग टेबलवर ठेवली. स्टेफनी तिची न्याहरी आणि बाकीची कामे आटपून निवांत तिच्या खोलीत आली आणि मग ती त्या पेटीचे निरीक्षण करायला लागली. ती पेटी तिला थोडी विचित्रच वाटली, कारण त्या पेटीला उघडायला कोणतीही कडी किंवा बटन नव्हते. तसेच त्या पेटीवर हिब्रू भाषेत ही काहीतरी लिहिलेले होते. स्टेफनीला तिच्या जवळ असलेल्या प्रत्येक वस्तूचा इतिहास थोडाफार माहीत होता म्हणून तिला ह्या पेटीवर लिहिलेली भाषा ही हिब्रू आहे हे लगेच समजले.

स्टेफनीने त्या पेटीकडे निरखून बघितले आणि मग जेव्हा त्या पेटीला उचलण्यासाठी तिने त्या पेटीला हात लावताच त्या पेटीमधून विचित्र भयानक असे आवाज यायला लागले. पण तिने त्या पेटीवरचा हात काढताच ते बंद झाले. असं तिने २-३ वेळा केले. पण प्रत्येकवेळी तसेच घडत होते. मग तिने त्या पेटीकडे दुर्लक्ष केले व ती फणीने तिचे केस विंचरायला लागली. तर तिच्या लक्षात आले की, जवळ जवळ तिचे अर्धे केस तिच्या हातात होते. तिला काही कळेना, असे का होत आहे, तसेच ती थोडी घाबरली ही, तिला पटकन क्लिक झाले की, हे सगळे त्या विचित्र पेटीमुळेच होत आहे म्हणून तिने ती पेटी हतोडीने तोडायचे ठरवले. ती त्या पेटीवर हतोडी मारणार, इतक्यात त्या पेटीमधून परत तसेच विचित्र आवाज यायला लागले आणि अचानक तिच्या खोलीत जोराची हवा आली व त्या हवेच्या झोतात तिचे शरीर वेडेवाकडे होऊन जोरात जमिनीवर आदळले. तसेच तिची काही हाडे आपणहूनच मोडली गेली आणि ह्या गंभीर दुखपतीमुळे ती जागीच बेशुद्ध पडली. इतक्यात रॉबर्ट आईबरोबर आज जास्त वेळ घालवता यावा म्हणून लवकर घरी आला. त्याने बेल वाजवली पण कोणीच दरवाजा उघडला नव्हते. म्हणून त्याने त्याच्याजवळ असलेल्या दुसऱ्या किल्लीने घराचा दरवाजा उघडला व "मम्मा.. .मम्मा" अशी हाक मारत तो स्टेफनीच्या खोलीत शिरला आणि तिला ह्या अवस्थेत पाहून तो अवाक् झाला. त्याने लगेच तिला हॉस्पिटलमध्ये नेले.

रॉबर्टच्या घरापासून काही अंतरावर पीटर आणि त्याची पत्नी लिसा आपल्या दोन मुली रिहाना (१० वर्ष)आणि जुलिया (१४ वर्ष) सोबत राहत होते. पण रोज रोजच्या मतभेदांमुळे पीटर आणि लिसा विभक्त झाले होते. तसेच लिसा आता दुसऱ्या एका माणसाला डेट पण करत होती. हा घटस्फोट दोघांच्या आपसी संमतीने झाल्यामुळे प्रत्येक वीकएंडला मुलींची जबाबदारी पीटर वर असे.

आज वीकएंड असल्यामुळे सकाळी सकाळीच पीटर मुलींना त्याच्या घरी घेऊन जायला लिसाच्या प्रियकराच्या घरी आला. जिथे सध्या लिसा तिच्या दोन मुलींबरोबर राहत होती. मुलीही दर विकएंडला वडिलांबरोबर वेळ घालवण्यासाठी खूप उत्साहित असायच्या. तेवढ्यात पीटर तिथे आला.

पीटर, रिहाना आणि जुलिया तिघेही लिसाला निरोप देऊन पीटरच्या घरी जायला निघाले. ते तिघे घरी जात असताना वाटेत एका घरासमोर एक माणूस घरातील काही सामान विकताना त्यांना दिसला. ते सामान बऱ्यापैकी अँटिक (पुरातन) दिसत होते आणि ते सामान विकणारा दुसरा तिसरा कोणी नसून स्टेफनीचा मुलगा रॉबर्ट होता, जो त्याच्या आईच्या सांगण्यावरून तिने साठवलेल्या पुरातन वस्तू विकत होता.

पीटर आणि मुली त्या पुरातन वस्तू पाहण्यात गुंग झाले. इतक्यात पीटरची छोटी मुलगी रिहानाची नजर त्या पेटीवर पडली आणि तिने पीटरला ती पेटी विकत घेऊन देण्याचा हट्ट केला. पीटरनेही रिहानाच्या आनंदासाठी ती पेटी विकत घेतली. ही तीच पेटी होती ज्यामुळे स्टेफनीला गंभीर दुखापत झाली होती आणि त्यातून ती थोडक्यात वाचली होती.

रिहाना खूपच आनंदी झाली पण तितक्यात तिची नजर रॉबर्टच्या घराच्या खिडकीत गेली. जिथे स्टेफनी भरपूर बँडेज लावून पहुडलेली तिला दिसली. जिच्यावर काही दिवसांपूर्वीच एका अज्ञात शक्तीने हल्ला केला होता. ती रिहानाकडे सारखी एकटक बघत होती, पण जेव्हा तिने रिहानाच्या हातात ती राक्षसी, भयानक पेटी बघितली. तेव्हा ती सगळा जीव एकवटून

जोरात 'नाही' असे ओरडली. रिहाना तो सर्व प्रकार बघून खूपच घाबरली म्हणून पीटर रिहानाला तडक तिथून घेऊन घरी निघून गेला.

पीटर, रिहाना आणि जुलिया ती पेटी घेऊन घरी आले. रिहाना स्टेफनीच्या विचित्र वागण्यामुळे अजूनही थोडी घाबरलेली होती. इतके असूनही ती पेटी उघडून बघायची तिला खूप उत्सुकताही होती. पण जुलियाला त्या पेटित काहीच इंटरेस्ट नव्हता म्हणून ती स्वतःच्या रूममध्ये निघून गेली.

पीटर रिहानाचा मूड चांगला करण्यासाठी तिला ती पेटी उघडण्यास मदत करू लागला. पण काही केल्या ती पेटी उघडतच नव्हती. कारण त्या पेटीला उघडायला कोणतीही कडी किंवा बटण नव्हते. दोघांनाही हे थोडे विचित्र वाटलं. म्हणून मग पीटरने त्या पेटीला हलवले तेव्हा त्याला त्या पेटीमध्ये काहीतरी सामान असल्याची खात्री झाली.

तो रिहानाला म्हणाला की, "आपण नंतर ती पेटी उघडू. पण आता मला एक गुडन्यूज तुमच्या दोघींबरोबर share करायची आहे" असे बोलून त्याने दोघींना एकत्र बसवून त्याला त्याच्या नोकरीत प्रमोशन मिळाल्याची बातमी सांगितली. त्या दोघीही खुपच खुश झाल्या. त्यानंतर पीटर, रिहाना, जुलिया तिघांनीही दिवसभर खूपच मजा, मस्ती केली. त्यामुळे तात्पुरता त्या पेटीचा विषय बाजूला झाला.

रात्री डिनर आटपून पिटरने दोघींना त्यांच्या त्यांच्या रूममध्ये झोपवले आणि तो स्वतःच्या रूममध्ये झोपायला निघून गेला. दिवसभराच्या एन्जॉयमेंटमुळे रिहाना खूपच थकली होती म्हणून ती पडल्या पडल्या झोपली.

अचानक मध्यरात्री कसल्यातरी भयानक आवाजाने रिहानाची झोपमोड झाली. तिने लाइट्स चालू केले तेव्हा तिच्या लक्षात आलं की, हा आवाज त्या पेटीतून येत आहे. ती त्या पेटीजवळ गेली आणि तिने ती पेटी उचलली. ती पेटी रिहानाने हातात घेताच ती आपोआप उघडली गेली. रिहाना त्या पेटीतील वस्तूंकडे एकटक बघू लागली.

त्या पेटीमध्ये तिला एक दात, एक मेलेला कीटक, एक लाकडाचा प्राणी आणि एक अंगठी दिसली. ती अंगठी तिला इतकी आकर्षक वाटली की, तिने ती लगेच स्वतःच्या बोटात घातली आणि त्या पेटीला बंद करून कवटाळून ती झोपी गेली.

दुसऱ्या दिवसाच्या सकाळी जेव्हा रिहाना उठली, तेव्हा तिला स्वतःमध्ये काहीतरी विलक्षण असा बदल झाल्यासारखा वाटला. तिला सारखे सारखे एकटे राहावे असं काहीतरी वाटत होते. इतक्यात तिला पुन्हा रात्रीसारखे तेच विचित्र आणि भयानक असे आवाज त्या पेटीतून ऐकायला यायला लागले आणि त्याचबरोबर आश्चर्य म्हणजे आतापण ती पेटी आपोआपच उघडली गेली.

रिहाना सुध्दा वश झाल्यासारखी एकटक त्या पेटीकडे बघत होती. असेच बघता बघता तिच्या एका डोळ्याचे बुबुळ सफेद झाले. हे सर्व होत असतानाच, अचानक तिथे पीटर रिहानाला न्याहरी करायला बोलवायला आला, पीटरच्या त्या अनपेक्षित आवाजाने रिहानाची

तंद्री भंग पावली, जणू काही क्षणापूर्वी काही घडलेच नाही अशाप्रकारे, रिहाना न्याहरी घेण्यासाठी पीटरबरोबर निघून गेली.

पण त्या दिवशी डायनिंग टेबलवर अनपेक्षित असं काहीतरी घडलं. रिहाना ताटातील न्याहरी खाता खाता काटेरी चमचा (fork) टेबलवर सारखी सारखी आपटत होती. हे बघून पीटर तिच्यावर ओरडला आणि तिला नीट खाण्यासाठी सांगू लागला तर रिहानाने त्याच चमच्याने अचानक पीटर वर हल्ला केला आणि त्याला जखमी केले.

पण काही क्षणातच तिला तिची चूक सुध्दा कळली आणि ती पीटरला, "माफ करा बाबा. चुकुन झालं, मी मुद्दामून नाही केलं, कृपया माफ करा" असे रडत बोलून विनवणी करू लागली. पण अचानक झालेल्या हल्ल्याने पीटरचा राग अनावर झाला. त्याने लागलीच रागातच रिहानाला तिच्या खोलीत जायला सांगितले. रिहाना रडत रडत धावतच तिच्या खोलीत गेली. पीटरला रिहानाच्या अशा विचीत्र वागण्याचे आश्चर्य वाटत होते. पण रिहानाच्या अशा वागण्याचा त्याला राग ही आला होता. त्या दिवशी तिघेही घरातच राहिले.

त्याच रात्री पुन्हा एकदा ती पेटी आपोआप उघडली आणि ह्या वेळी त्या पेटीमधून खूप सारे उडणारे कीटक बाहेर पडले. तेवढ्यात रात्री दात घासण्यासाठी म्हणून जुलिया तिच्या खोली बाहेर जेव्हा आली, तर तिला पूर्ण घरात खूप सारे कीटक फिरताना दिसले. ती हे पाहून इतकी घाबरली की, ती जोरजोरात तिच्या वडिलांना म्हणजेच पीटरला हाक मारायला लागली. पीटर धावतच जुलियाच्या आवाजाच्या दिशेने आला. बघतो तर सगळ्या घरात खूप सारे कीटक उडत होते.

त्याला समजत नव्हते की, हे इतके सारे कीटक अचानक कुठून येत आहेत? इतक्यात त्याची नजर रिहानाच्या खोलीकडे गेली, तेव्हा त्याच्या लक्षात आले की, हे किटक तिच्या खोलीतूनच येत आहेत. त्याने लगेच तिच्या खोलीचा दरवाजा वाजवला पण काहीच प्रत्युत्तर आले नाही. मग मात्र त्याने जोरात दरवाजा ढकलला.. आणि तो रिहानाच्या खोलीत गेला आणि पाहतो तर, रिहानाच्या हातात ती पेटी होती ती पण उघडलेली आणि त्याच पेटीतून ते हजारो कीटक बाहेर येत होते.त्याने लागलीच रिहानाला त्या पेटीपासून दूर केले आणि तिला त्या खोलीतून बाहेर काढले. हे सगळे खूपच अनपेक्षित आणि विचित्र होते.

तसेच त्याच्या मनात शंकेची पाल चुकचुकली की, रिहाना बरोबर काहीतरी वेगळचं घडत आहे आणि ते सामान्य नाही. कदाचित ह्याचं कारण ती पेटी?????

जुलिया आणि रिहानाला लिसाकडे सोडून पीटरने दुसऱ्याच दिवशी सगळ्या घरात पेस्टकंट्रोल केले. इथे लिसाला जुलियाने पीटरच्या घरी घडलेले सर्व प्रकार सांगितले. पण तिला सारखं असे वाटतं होते की, पीटर आणि तिच्या घटस्फोटाचा परिणाम म्हणून रिहाना असे विचित्र वागत असेल. पण तिला कुठे माहीत होते की, यामागील खरं कारण काहीतरी वेगळेच होते..

असेच एकेदिवशी पीटरला जुलियाच्या शाळेतल्या वार्षिक स्नेहसंमेलनाला जायचे होते, जुलियाने तसे फोन करून आदल्यादिवशीच निरोप दिला होता, परंतु त्याच दिवशी योगायोगाने पीटरला ऑफिसमध्ये भरपूर काम होते आणि तो ऑफिसच्या कामात इतका गुंतला की, तो कार्यक्रमाला जायला पूर्णपणे विसरला आणि जेव्हा त्याच्या लक्षात ही गोष्ट आली, तेव्हा

वेळ निघून गेलेली होती.. त्याला खूपच वाईट वाटले.. त्याने लगेच जुलियाला फोन केला, पण ती खूपच रागात होती. म्हणून तीने पीटरचा आवाज ऐकताच फोन रिहानाकडे दिला.

पण रिहानाचं काहीतरी वेगळंच चाललं होतं.. ती सारखी पीटरला ती पेटी नीट ठेव आणि तिला हाथ नको लावू अशा वारंवार सूचना देत होती.. पिटरने वैतागून फोनच ठेवून दिला.. तो ऑफिसवरून घरी आला तरी त्याच्या कानात रिहानाचे तेच शब्द घुमत होते.. त्याला इतका प्रचंड संताप आलेला की लागलीच तो रिहानाच्या रूममध्ये गेला आणि त्याने शक्य त्याप्रकारे ती पेटी उघडण्याचा प्रयत्न केला.. पण त्याला ह्यात काहीही यश आले नाही.. मग त्याने त्या पेटीला तिथेच टाकून तो झोपायला निघून गेला.

इथे काहीतरी वेगळच घडत होतं.. अचानक रिहानाला तिच्या तोंडात काहीतरी असल्याचे जाणवले. ती तडक वॉशरूम मध्ये गेली.. आणि बॅटरीचा फ्लॅश तोंडाच्या आत मारून बघू लागली आणि तिला तिच्या तोंडात कोणाचीतरी बोटे असल्याचे दिसले, ती घाबरून जोरात ओरडण्याचा, किंचाळण्याचा प्रयत्न करू लागली.. पण तिचा आवाज काही केल्या बाहेर निघतच नव्हता.. अशातच ती पेटी तिला तिच्या वॉशरूम मध्ये दिसली.. जी पीटरच्या घरातल्या तिच्या रूममध्ये होती. रिहानाने पटकन ती पेटी स्वतःच्या बॅगमध्ये ठेवली आणि ती झोपली..

दुसऱ्या दिवशी शाळेत रिहानाची बॅग मस्करीत एका मुलाने लपवून स्वतःजवळ ठेवली. ज्यामध्ये ती पेटी होती. रिहाना सगळीकडे तिची बॅग शोधू लागली आणि जेव्हा तिला तिची बॅग त्या मुलाकडे आढळली.. तशी रिहाना अचानक खूपच आक्रमक झाली की, तिने त्या मुलाच्या २-३ कानशिलात मारून त्याच्याकडून ती बॅग हिसकावून घेतली.

शाळेतल्या टीचर मार्टिना ह्यांनी तिला थांबवण्याचा प्रयत्न केला पण ती काहीच ऐकायला तयार नव्हती.. मग मार्टिनाने तातडीने रिहानाच्या आई-वडिलांना शाळेत बोलवले.

मार्टिना रिहानाच्या आई-वडिलांकडे रिहानाची तक्रार करत म्हणू लागली की, "रिहाना आजकाल खूपच एकटी एकटी राहते.. कोणत्याच मुलांमध्ये मिसळत नाही.. तसेच ती खूप आक्रमक ही झाली आहे, तिचा गृहपाठ पण तिने करणे पूर्णपणे बंद केले आहे. एक आई-वडील म्हणून तुम्हाला तुमच्या मुलीला वेळ देणे जरुरी आहे.. " असे बोलून मार्टिनाने रिहानाची बॅग जप्त करून ती घेऊन टीचर रूम मधल्या लॉकरमध्ये ती कुलूपबंद केली. पण तिला काय माहीत त्या बॅगच्या आत काय होते ते..

त्यादिवशी मार्टिना टीचररूममध्ये रात्री उशिरापर्यंत काहीतरी काम करत होती.. इतक्यात अचानक त्या रूम मध्ये जोराचा वारा वाहायला लागला.. त्याचा जोर इतका होता.. की टेबल वरचे कागद रूममध्ये इतस्ततः पसरले.. ती ते गोळा करण्याचा प्रयत्न करत असतानाच तिच्या हातावर कसलातरी ठिपका पडला. तिने हाथ लावून बघताच तिला कळले की ते रक्त आहे.. आणि नंतर अक्षरशः तिच्या डोळ्यातून अश्रूंसारखे ते गळायला लागले.. मार्टिना हा सगळा प्रकार पाहून खूपच घाबरली आणि ती ओरडणार इतक्यात तिचे शरीर हवेत इकडे तिकडे आपटायला लागले.. आणि शेवटी ते खिडकी तोडून बाहेर फेकले गेले आणि त्यातच ती मरण पावली.. त्या सैतानी पेटीने अजून एक जीव घेतला होता..

दुसऱ्या दिवशी मार्टिनाच्या अकस्मात निधनामुळे शाळा बंद ठेवण्यात आली.. तिचं हे अचानक मरण एक गूढ बनून राहिले. तिच्या मृत्यूला सुसाईड(sucide) हे कारण देऊन शाळेने हा विषय संपवला.

रिहाना आणि जुलिया काही दिवसांसाठी पीटरच्च्या घरी राहायला आल्या.. कारण लिसाला दोन दिवसांसाठी कामानिमित्त परगावी जायचे होते.

रिहानाने आल्यापासून एकच चंग बांधला होता.. ती सारखी पीटरला तिची बॅग शाळेतून परत आणायला सांगत होती.. तिला काहीच पर्वा नव्हती की, तिची टीचर मार्टिना आता या जगात नाही.

पीटर रिहानाला म्हणाला,"उद्या शाळेत गेल्यावर तुझी बॅग परत आणू.. पण त्या बॅगेत असे काय आहे, ज्यामुळे तू अशी वागलीस. त्या मुलाला कानशिलात मारलेस?"

त्यावर रिहाना बोलू लागली की, "त्या बॅगमध्ये माझी आवडती पेटी आहे आणि त्या पेटीमध्ये माझी एक मैत्रीण राहते.. जिला कोणीच बघू शकत नाही आणि ती मैत्रीण माझ्यासाठी खूप महत्वाची आहे."

हे सगळे पीटरला थोडे विचित्रच वाटले.. त्यामुळे पीटरने रिहानाला कळायच्या आत दुसऱ्या दिवशीच तिची जप्त झालेली बॅग परत मिळवून त्यामध्ये असलेल्या पेटीला तो लांब कुठेतरी सोडून आला..

रिहानाला तिच्या बॅगेत जेव्हा ती पेटी दिसली नाही तेव्हा ती पीटरवर खूपच रागावली आणि त्याला घालून पाडून बोलली.. इतकी की, तिला समजत नव्हते ती किती आणि काय काय बोलत आहे ते.

ती सारखी बोलत होती की, "तुम्ही खूप वाईट आहात, म्हणून मम्मीने तुम्हाला सोडले. मम्मीचा प्रियकर खूपच चांगला आहे.. तोच आमचा वडील होण्यायोग्य आहे.. तुम्ही नाही.. मी तुमचा द्वेष करते" वगैरे वगैरे.. पीटरला हे सगळे ऐकून फार दुःख झाले..

त्याने रिहानाला तिच्या रूममध्ये जायला सांगितले, पण त्याचवेळी रिहानाला अदृश्य शक्तीने कानशिलात लगावले.. पण असे दिसले की, पीटरनेच तिला मारले असावे.. रिहाना जोरात रडायला लागली आणि पीटर वर आरोप करायला लागली, तेवढ्यातच जुलिया तिथे आली आणि तिला वाटले की, पीटरनेच रिहानाला कानशिलात मारले असावे.. ती काही बोलायच्या आत रिहाना घरातून रागाने बाहेर पडली आणि ती रस्त्यावरून धावत धावत त्या पेटीपर्यंत पोहोचली.. जणूकाही ती पेटीच तिला बोलवत होती. तिथे पोहचल्यावर ती त्या पेटीशी एका सांकेतिक भाषेत बोलायला लागली.. ते बोलता बोलता रिहानाच्या तोंडातून खूप सारे कीटक निघायला लागले आणि ती त्याच जागी बेशुद्ध पडली..

पीटर सुद्धा रिहानाच्या पाठी धावत धावत तिथपर्यंत पोहोचला. तो रिहानाला उचलून घरी घेऊन जातच होता.. तितक्यात तिथे लिसा आणि जुलिया आले.. लिसा नुकतीच घरी पोहचली असेल तेवढ्यात तिला जुलियाचा फोन आला आणि तिने लिसाला फोनवर

सांगितले की, पीटरने रिहानावर हाथ उचलला. लिसा दोन्ही मुलींना आपल्याबरोबर घरी घेऊन गेली.. आणि पीटरला आता कोर्टात भेटू अशी धमकी ही तिने दिली.

यासंदर्भात कोर्टाने हा निर्णय घेतला की, पीटर आता कधीही त्याच्या मुलींना भेटू शकणार नाही.. कारण त्याने रिहानावर हाथ उचलला होता.. लिसा इतकी रागवलेली होती की, तिने पीटरची बाजू ऐकून ही घेतली नाही.. पीटर ही ह्या वर काहीच बोलला नाही..

दोन्ही मुली आता लिसाच्या घरी राहायला लागल्या. एकेदिवशी रिहाना तिच्या रूममध्ये बसलेली होती. तेव्हा तिच्या हातात तो दात होता, जो तिला त्या पेटीमध्ये मिळाला होता.. काही वेळात अचानक पणे तिचे डोळे सफेद व्हायला लागले, तसेच तिचा चेहराही ओबडधोबड झाला जसा तिच्या चेहऱ्याच्या आत कोणाचा तरी हाथ असावा असा.. .. .

पीटरला राहून राहून ह्या सगळयाचे मूळ ती पेटीचं वाटत होती.. त्या दिवसानंतर तो ती पेटी परत घरी घेऊन आला आणि ती पेटी घेऊन पीटर त्याच्या कॉलेजच्या प्राध्यापकांना दाखवायला गेला.. त्यांना कदाचित ह्या पेटीबद्दल थोडे फार माहीत असेल ह्याची त्याला पूर्ण खात्री होती.

जेव्हा त्याने त्याच्या प्राध्यापकांना ती पेटी दाखवली तेव्हा त्यांनी लक्षपूर्वक त्या पेटीचे निरीक्षण केले. त्यांना पौराणिक वस्तूंचा अभ्यास असल्यामुळे त्यांनी लगेच ह्या पेटीला ओळखले व ते म्हणाले, "ही पेटी Jewish प्रांतातील आहे आणि ह्यावर हिब्रू भाषेत काहीतरी कोरले गेलेय..

ही एक dybbuk पेटी आहे.. dybbuk म्हणजे जिवंत माणसाच्या शरीरात प्रवेश करून त्याच्या वागण्याबोलण्यावर नियंत्रण ठेवणारा मृत व्यक्तीचा आत्मा.. judaism धर्मामध्ये लोक चांगल्या व वाईट आत्म्यांमध्ये भरोसा ठेवायचे.. त्यांनीच dybbuk ही पेटी बनविली होती.. जिथे ते वाईट आत्म्यांना बंद करून ठेवत असत.. ह्यामुळे ह्या पेटीला खोलने सोपे नाही.. कारण ही पेटी बनवणाऱ्यांना हे आवडणारच नाही की, ती पेटी खोलून तुम्ही त्या वाईट आत्म्याला मोकळे कराल.. " आणि त्यांनी पीटरला ही पेटी न उघडण्याचा सल्ला ही दिला.

हे सगळे जाणून घेतल्यावर पीटरने इंटरनेटवर ही ह्याबाबत शोध घेतला.. आणि त्याला काही jewish मंत्रतंत्र मिळाले जे खूपच त्रासदायक होते.. आणि त्याला कळून चुकले की रिहाना खूप मोठ्या संकटात आहे म्हणून पीटर लगेच लिसाच्या घरी गेला व त्याने रिहानाच्या जवळ बसून इंग्रजी अनुवादित हिब्रू बायबलच म्हणायला सुरुवात केली.. रिहानाने हे सर्व बघितले आणि तिची नजर पीटरवर पडताच त्याच्या हातातील पुस्तक लांब जाऊन पडले..

इतक्यात अचानक लिसा तिथे आली आणि तीने पीटरचे काही ऐकून न घेता त्याला घरातून बाहेर काढले.. पीटर लिसाला खूप विनवणी करत होता.. पण तिने त्याचे एक नाही ऐकले..

ह्यानंतर दुसरा मार्ग म्हणून तो दुसऱ्याच दिवशी ब्रूक्लीन या शहरात गेला. तिथे तो स्टीव्हन नावाच्या माणसाला भेटला.. जो hesidic संघाशी संबंधित होता.. स्टीव्हन पीटरला त्याच्या वडिलांना भेटवयास घेऊन गेला.. जे खूपच पारंपरिक विचारवादी होते, तसेच त्या ठिकाणी त्यांच्या संघातील अजूनही काही अनुभवी लोक उपस्थित होते.. पीटरने स्टिव्हनच्या

वडिलांना dybbuk पेटी दाखवली.. त्या पेटीला बघताच सगळे लोक मागे सरकले.. जणू काही अशुभ पाहिल्या सारखे!!

स्टिव्हनने त्याच्या वडिलांना पीटरचे इथे येण्याचे कारण सांगितले.. ते ऐकूण स्टिव्हनच्या वडीलांनी पीटरला विचारले की, "तू ही पेटी उघडलीस आहे का?"

त्यावर पीटर त्यांना असे म्हणाला की, "ह्या पेटीला माझ्या लहान मुलीने म्हणजेच रिहानाने उघडले होते"

असे बोलून त्यानंतर जे जे घडले ते सर्व पिटरने स्टिव्हनच्या वडिलांना जशासतसे सांगितले.

हे ऐकताच काही लोक त्या रूममधून बाहेर निघून गेली.. पण पीटर आशेने स्टिव्हनच्या वडिलांकडे पाहायला लागला.. कारण आता तेच त्याला मदत करू शकत होते..

तेव्हा स्टिव्हनचे वडील पीटरला म्हणाले की, "ही एक dybbuk पेटी आहे आणि ह्या पेटीमध्ये जी वाईट आत्मा होती तिला एक शुद्ध आत्मा हवी होती.. ही आत्मा रिहानाला ३ अवस्थांमध्ये वश करेल.. पहिल्या अवस्थेत त्या व्यक्तीला स्वप्न पडतील आणि विचित्र आवाज ऐकायला येतील.. दुसऱ्या अवस्थेमध्ये ती रिहानाचे रक्षण करून बाकी लोकांशी वेगळे ठेवेल किंवा दूर घेऊन जाईल.. आणि तिसऱ्या अवस्थेत ती पूर्णपणे रिहानाच्या शरीरावर कब्जा करेल.. ज्यामध्ये रिहाना आणि ती वाईट आत्मा एकरूप होतील.. आणि रिहाना आता शेवटच्या अवस्थेत आहे.. आणि लवकरच काही केले नाही तर ती पूर्णपणे त्या आत्म्याच्या कब्जात जाईल.. ह्या

आत्म्याला थांबविण्याचा एकच मार्ग आहे.. तो असा की, तुला त्या सैतानी आत्म्याचे नाव घेवुन त्याला आदेश द्यावा लागेल की, 'तू त्या पेटीच्या आतमध्ये परत जा' आणि तो आत्मा आत गेल्यावर तुला ती पेटी कुलूपबंद करावी लागेल.. "

पण पीटरला त्या सैतानी आत्म्याचे नावच माहीत नव्हते म्हणून त्याने स्टिव्हनच्या वडीलांकडे याबाबत  मदत मागितली.. पण त्यांनी ती देण्यास साफ नकार दिला.. .कारण कोणतेही मंत्रतंत्र करने अशा प्रथा आजकालच्या जगात बेकायदेशीर झाल्या आहेत.. त्यामुळे मी तुला काहीही मदत करू शकत नाही.

हे ऐकून उदास होऊन पीटर ती पेटी घेऊन तिथून परत जायला निघाला.. तेव्हा स्टिव्हन धावत त्याच्या पाठी आला आणि त्याने पीटरला शक्य ती मदत करण्याचे आश्वासन दिले..

इथे रिहाना हळूहळू त्या आत्म्याच्या वश होत होती. त्या रात्री खूपच विचित्र घटना घडली.. लिसा मध्यरात्री पाणी संपले म्हणून स्वयंपाकघरात गेली असताना

तिला स्वयंपाकघरात थोडा उजेड दिसला.. तिने पुढे होऊन पाहिले तर फ्रिज उघडे होते.. आणि त्याचा अंधुक प्रकाश खोलीभर पसरला होता.. तिला थोडे अजब वाटले.. ती अजून पुढे जाणार इतक्यात तिला तिथे कोणीतरी असल्याचा भास झाला.. पण नंतर तिला जे दृष्टीस पडले, ते इतके किळसवाणे होते की, पुढे जाण्याची तिला हिम्मतच होत नव्हती.. तिथे दुसरे तिसरे

कोणी नसून रिहाना होती आणि ती फ्रिजमध्ये ठेवलेले कच्चे मांस अगदी जनावारांसारखी खात होती.. हे चित्र बघून लिसा खुपच घाबरली.. इतक्यात रिहानाचे लक्ष लिसा कडे गेले.

रिहाना अगदी मृदू आवाजात लिसाला सारखी सारखी बोलत होती, "मम्मा मी नाहीये इथे.. मी हे नाही करत आहे.. " असे बोलता बोलता ती अचानक आक्रमक झाली आणि तिने चक्क तिच्या आईच्या म्हणजे लिसाच्या अंगावर काचेची भांडी फेकायला सुरुवात केली.. पण अजूनही रिहाना पूर्णपणे त्या आत्म्याच्या काबीज न झाल्यामुळे तिने खूप ताकदीने स्वतःला रोखले..

ह्या घटनेमुळे लिसा खूपच घाबरली होती.. तिने घडलेली सगळी हकीकत तिच्या प्रियकराला सांगितली. त्याला ही काही दिवसांपासून रिहानाचा स्वभाव थोडा बदलेला जाणवत होता.. पण त्याने उगाच लिसाला त्रास नको म्हणून त्याबद्दल तिला तो काहीही बोलत नव्हता.. त्याने लिसाला धीर दिला आणि त्याने यावर उपाय म्हणून रिहानाला एखाद्या चांगल्या मानसशास्त्रज्ञाकडे दाखवायला हवे असे लिसाला सुचविले.. त्यानंतर ते दोघे झोपी गेले..

दुसऱ्या दिवशी सकाळी लिसाचा प्रियकर कामानिमित्त जाण्यास त्याची कार गेटच्या बाहेर काढत होता.. इतक्यात त्याला त्याच्या गाडीच्या समोर रिहाना उभी असलेली दिसली.. त्याने तिला बाजू होण्यास सांगितले.. पण रिहानाने त्याच्या बोलण्याकडे लक्षच दिले नाही.. उलट ती एकटक त्याच्याकडे सारखी विचित्र नजरेने बघत होती.. म्हणून तो गाडीतून खाली उतरून रिहानाला बाजूला करायला जाणार इतक्यात तिथे अचानक जोरात हवा सुरू झाली आणि लिसाच्या प्रियकराच्या तोंडातून अचानक रक्त यायला लागले आणि त्यातच त्याचे सगळे

दात तुटुन बाहेर पडले.. त्यामुळे तो रक्तबंबाळ झाला. हे इतके अचानक झाले की, तो घाबरून तिथून पळून गेला..

हे सगळे बघता बघता लिसा आणि जुलिया घरातून बाहेर आल्या आणि बघतात तर पुन्हा रिहानाच्या तोंडातून एक कीडा बाहेर पडला आणि रिहाना तिथेच बेशुद्ध झाली..

इथे स्टिव्हन dybbuk पेटी ची पाहणी करत होता.. तसेच ती पेटी खोलण्याचा प्रयत्न ही करत होता.. काहीवेळाने त्याने काही मंत्रोच्चार करायला सुरुवात केली आणि कोण आश्चर्य ती पेटी आपोआप उघडली गेली..

ती पेटी उघडताच त्यात त्याला एक आरसा दिसला.. त्याने लगेच त्या आरश्याला तोडले. तो आरसा तोडल्यावर त्याला दिसले की, त्या आरशाच्या पाठीमागे त्या पेटीवर त्या वाईट आत्म्याचे नाव कोरलेले होते.. आणि त्या आत्म्याचे नाव होते "अबीजू".

इथे रिहाना बेशुद्ध झाल्यावर लिसा तिला इस्पितळात घेऊन गेली आणि ती शुद्धीवर येण्याआधी तिने डॉक्टरांना रिहानाचा MRI स्कॅन करायला सांगितला.. जेणेकरून हे कळेल की तिच्या तोंडातून किडा कसा बाहेर आला.. डॉक्टर स्कॅन करत असताना लिसाला संगणकामध्ये रिहाना च्या शरीरात एक विचित्र अशी दानवी आकृती दिसली.. ती हे बघून इतकी घाबरून गेली की, काय करावे हे तिला सुचत नव्हते..

तेवढ्यात त्या इस्पितळात पीटर, जुलिया आणि स्टिव्हन पोहोचले.. पीटर आणि स्टिव्हन जेव्हा ती पेटी घेऊन लिसाच्या घरी गेले. तेव्हा जुलियाने पीटरला घडलेली सर्व हकीकत

सांगितली आणि मग ते तिघेही इस्पितळात यायला निघाले.. लिसाला त्या सर्वांना पाहून खूप धीर आला..

स्टिव्हनने सर्वांना सांगितले की, जर आपल्याला रिहाना ला पहिल्यासारखे करायचे असेल तर इथेच तिच्यावर मंत्रोच्चार करावे लागतील.. मग लिसा, पीटर, स्टिव्हन आणि जुलिया हे चौघे रिहाना ला इस्पितळाच्या फिजिकल रूम मध्ये घेऊन गेले आणि इथे सुरू झाली रिहानाच्या मंत्रोच्चाराची प्रक्रिया..

मंत्रोच्चार सुरू झाल्यावर स्टिव्हनने परिवारातील सगळयांना काहिना काही ह्या पेटीमध्ये टाकायला सांगितले.. जे त्यांच्या हृदयाच्या अगदी जवळचे असेल अर्थात घडयाळ, स्वतःचे केस, फॅमिलीचा फोटो, लग्नाची अंगठी इत्यादी..

जशी स्टिव्हनने मंत्रोच्चाराच्या विधीला सुरूवात केली तशी रिहाना तिच्या सैतानी रुपात येऊन सगळयांवर हल्ला करायला लागली.. हे पाहून पीटर जोरजोरात त्या आत्म्याला बोलवायला लागला.. जेणेकरून रिहाना चे शरीर सोडून देऊन त्या आत्म्याने पीटरला स्वतः शिकार बनवावे.. पण रिहाना धावत जाऊन मुद्दाम दुसरीकडे लपून बसली.. पीटरही तिच्या पाठी पाठी गेला आणि रिहाना पीटर वर हल्ला करणारच होती, पण तो त्यातून कसातरी वाचला..

पण विधी सुरू असताना अचानक त्या आत्माने रिहानाचे शरीर सोडून पीटर च्या शरीरात प्रवेश केला आणि ती तिथेच बेशुद्ध झाली.. पीटर रिहानाला घेऊन परत सगळे होते त्या ठिकाणी आला..

सगळयांना वाटले की, तो सैतानी आत्मा पळून गेलाय.. पण स्टिव्हन समजून होता की, त्या आत्म्याने दुसऱ्या एका शरीराला वश केले आहे.. स्टिव्हन जोरजोरात "अबीजू" हे त्या आत्म्याचे नाव घेऊन त्या आत्म्याला dybbuk पेटीमध्ये परत जाण्याचा आदेश द्यायला लागला..

तेव्हा अचानक पीटरच्या शरीरावरचे हावभाव बदलताना दिसले आणि त्याच्या तोंडून एक सैतानी आकृती बाहेर येताना दिसली.. ती दूसरी तिसरी कोणी नसून "अबीजू" होती.. स्टिव्हनने दिलेल्या आदेशामुळे ती त्या पेटीमध्ये खेचली जात होती आणि एकदाची ती सैतानी आत्मा त्या dybbuk पेटीमध्ये बंदीस्त झाली.. स्टिव्हनने ती पेटी पुन्हा मंत्रोच्चाराने बंद केली व या परिवाराचा निरोप घेतला.. तसेच 'रिहाना आता पूर्णपणे बरी झाली आहे', असेही तो म्हणाला. पीटर व लिसा दोघांनीही स्टिव्हन चे आभार मानले आणि त्याला निरोप दिला.. पण ह्या सर्व घटनांमुळे लिसा आणि पीटर पुन्हा एकमेकांच्या जवळ आले.. तसेच ते दोघे आणि जुलिया व रिहाना सगळे सोबत एकत्र आनंदाने राहू लागले..

इथे स्टीव्हन त्या पेटीला घेऊन ब्रूक्लीनला निघाला. तेव्हा वाटेत त्याची कार अचानक एका ट्रकला आदळली आणि त्याच्यात स्टीवनचा जागीच मृत्यू झाला. पण ह्या अपघातात ती dybbuk पेटी रस्स्यावर फेकली गेली..

म्हणजे आता दुसरे कोणी त्या सैतानी पेटीला उघडेल आणि "अबीजू" त्याला त्याची शिकार बनवेल.. !!!!!!

(ही कथा एका इंग्लीश मूव्हीवरून प्रेरित आहे. ही सत्यकथा २००० सालची आहे. केविन नावाच्या माणसाने एका १०३ वर्षाच्या महिलेच्या जुन्या इस्टेटीमधून ती पेटी विकत घेतली होती.. ती महिला तिच्या नातीला ती पेटी उघडायला मनाई करत असे.. जेव्हा केविन ने ती पेटी विकत घेतली तेव्हा त्याला त्याच्या एका सहकाऱ्याचा फोन आला.. की, खालच्या दुकानात कोणीतरी तोडफोड करत आहे.. जोपर्यंत केविन तिथे पोहोचला तोपर्यंत तो सहकारी तिथून पळून गेला होता.. आणि तिथे फर्निचर व काचेचे तुकडे पडलेले होते.. केविन चा तो सहकारी परत कधी नाही आला.. त्यानंतर केविन ने ती पेटी त्याच्या आईला भेटवस्तू म्हणून दिली.. ती पेटी देताच त्याच्या आईला एक अटॅक आला त्यात तिची बोलण्याची क्षमता गेली.. त्यानंतर केविनने त्याच्या परिवार आणि मित्र-मैत्रिणींनाही ती पेटी देण्याचा प्रयत्न केला.. पण ते

सर्व काही दिवसातच त्या पेटीला परत देत असत.. जो पण ती पेटी घेत असे त्याच्याबरोबर काहींनाकाही वाईट जरूर घडत असे.. आणि सगळे लोक म्हणत होते की, ही पेटी कोणत्या ना कोणत्या कारणाने शापित आहे.. कोणाच्या घराचा दरवाजा आपोआप उघडायचा, तर कोणाच्या घरात जास्मिन या फुलाचा किंवा मांजराच्या मुताचा वास येत असे..

असे म्हणतात, अशाप्रकारच्या शापित पेटीला तोडू नाही शकत कारण असे केल्यास त्यात असलेला तो सैतानी आत्मा मुक्त होऊन एखाद्या व्यक्तीला वश करायला बघतो.. अशातच केविन ला भीतीदायक स्वप्न पडू लागली होती.. तसेच त्याच्या परिवारातील लोकांनाही तशीच स्वप्ने पडत होती..

१३ तारखेच्या शुक्रवारी केविनच्या घरातील फिशटॅन्क मधले १० मासे त्याला मरून पडलेले दिसले.. मग कंटाळून केविन ती पेटी ebay नावाच्या वस्तू खरेदी विक्री संकेतस्थळावर एका विद्यार्थ्याला विकली.. त्याचे नाव नेटस्की होते.. तो म्हणाला ती पेटी त्याने विकत घेतल्यापासून त्याच्या खोलीतील सहकाऱ्यांना वाईट अनुभव आले.. ते आजारी पडू लागले, याचबरोबर कीटक आणि मेलेले उंदीर ही त्यांच्या खोलीत मिळू लागले.. तसेच त्यांची इलेक्ट्रॉनिक उपकरणेही खराब होऊ लागली.. आणि नेटस्कीचे तर केस ही गळायला लागले.. सध्या तो बॉक्स एका संग्रहालयात आहे.. तेथील माणसे बोलतात की, ह्या पेटीमध्ये अश्या आत्मा असतात ज्याच्या इच्छा अपुऱ्या राहतात.. आणि ह्या पेटी द्वारे त्या ते पूर्ण करतात.. ]

# अकल्पित



सकाळी ६ वाजताचा अलार्म वाजला.

निशाने तो बंद केला.. तिला आज मॉर्निंग वॉक ला जायचा कंटाळा आला होता..

ते थंडीचे दिवस होते.. म्हणून ती परत डोक्यावर चादर घेऊन झोपली.. पण नंतर तिच्या लक्षात आले की रिमा तीची वाट बघत असेल.. म्हणून ती मनात नसताना ही उठून गेली..

बाहेर अजून अंधारच होता..

निशा नेहमीच्या ठिकाणी पोहोचली. तरीही अजून रिमाचा काहीच पत्ता नव्हता. तसेच रीमा चा फोन ही लागत नव्हता.

"शीट यार, ही रीमा पण ना.. जर यायचे नव्हते तर आधीच सांगायचे ना.. मेसेज तरी करायचा होता.. किती झोप येत होती आज.. अरे यार.. जाऊ देत.. .हिला नंतरच बघते मी" असे ती स्वतःशीच पुटपुटली.

खूप वेळ रिमाची वाट बघितल्यानंतर तिने तिचा मॉर्निंग वॉक आणि रोजचा ठराविक व्यायाम एकटाच पुर्ण केला आणि ती घरी गेली.

तिने ठरवले की, ऑफिस मध्ये जायच्या आधी रिमाला भेटूनच जावे आणि थोडे ओरडून तिची गम्मत करावी.

पण सकाळी सकाळीच तिच्या ऑफिस मधून मेसेज आला की, महत्वाचे काम आल्यामुळे तिला अर्धा एक तास लवकर बोलावलंय. मेसेज वाचल्यावर निशाची तर भलतीच सटकली.

"आजचा दिवसच खराब आहे भेंडी.. एकतर त्या रिमाने सकाळी सकाळी टांग दिली आणि आता हा बॉस.. म्हणे महत्वाचे काम. च्यायला नशीबच वाईट. चलो निशा लगो काम पे" असे ती स्वतःशीच बोलली आणि पटापट तयारी करून ऑफिसला निघाली. तिने रिमाचा फैसला काय तो संध्याकाळी आल्यावर करायचा असं ठरवलं.

आज निशाला रोजच्यापेक्षा ऑफिसमध्ये जास्तच काम होते. त्यामुळे तिला घरी यायला पण खुप उशीर झाला. ती इतकी थकली होती की घरी आल्यावर ती अगदी पडल्या पडल्याच झोपली.. पुढे २-३ दिवस जास्त काम असल्यामुळे तिला काही दिवस मॉर्निंग वॉक ला ब्रेक द्यावा लागणार होता. त्यामुळे तिने झोपण्यापूर्वी रिमाला तिला २-३ दिवस मॉर्निंग वॉक ला यायला जमणार नाही असा मेसेज पाठवला.. आणि मग ती झोपली.

पुढचे काही दिवस निशाचे भलतेच व्यस्त गेले. कधी एकदाचा वीकएंड येतोय याची वाट निशा पाहत होती. म्हणता म्हणता रविवार उजाडला. आज निशाकडे भरपूर वेळ होता म्हणून तिने मेसेज वाचावे याकरिता व्हाट्स अँप ओपन केले. तर रिमाचा मेसेज डीलिव्हर झालाच नव्हता. अगदी एक टिक होते. तिने लगेच रिमाला फोन लावला तर तो स्वीच ऑफ येत होता. निशा भलतीच काळजीत पडली. रीमा ठीक तर असेल ना? तिला स्वतःलाच प्रश्न पडला.

ती तातडीने रीमाच्या घरी गेली. पोह्चताच समोर पाहते तर काय  तिच्या घरासमोर खूपच गर्दी होती आणि आत कोणीतरी जोरजोरात ओरडत होते. क्षणभर तर निशाच्या काळजाचा ठोकाच चुकला. तिच्या मनात नको-नकोते विचार येऊन गेले. तरी हिम्मतीने ती लोकांच्या गर्दीतून वाट काढत रीमाच्या घरात पोहोचली.

बघते तर काय!! रिमाचा अगदी अवतार झाला होता. केस विस्कटलेले होते. डोळे पार काळवंडले होते. पण नजर खुनशी वाटत होती. ती जोरजोरात हात-पाय आपटत होती. तिचा आवाज ही बदलला होता. विचित्र अश्या घोगऱ्या आवाजात ती जोरजोरात ओरडत होती. 'सोडणार नाही मी हिला, घेऊन जाणार, घेऊन जाणार!!'

अगदी ४-४ माणसांना पण ती आवरत नव्हती. तिथे असलेल्या ४-५ जणांनी तिचे हात-पाय गच्च बांधले. तरीही ती ओरडत होती, 'सोडा मला, सोडा मला!! मी घेऊनच जाणार हिला, सोडणार नाही!!' अचानक कोणीतरी तिच्या कपाळाला अंगारा लावताच ती बेशुध्द पडली. हळूहळू सगळी गर्दी पांगली. निशाला क्षणभर समोर पाहिलेल्या दृष्यावर विश्वासच बसत नव्हता. हे सगळे तिने सिनेमामध्ये बघितलेले होते आणि गोष्टींमध्ये ऐकले होते. पण प्रत्यक्षात अनुभवण्याची तिची ही पहिलीच वेळ होती.

रीमाच्या आई -वडिलांची तर हालत खुपच बेकार होती. निशाला बघून रीमाच्या आईला क्षणभर खूपच आनंद झाला आणि मग ती निशाला मिठी मारून ओक्साबोक्शी रडायला लागली. निशाने रीमाच्या आईला धीर दिला. तिने थोडे थांबून सविस्तर सगळे काही रीमाच्या आईला विचारले.

ती म्हणाली, " काकू काय झालंय रीमाला ती अशी विचित्र का वागतेय. काय अवतार करून घेतलाय तिने स्वतःचा. किती दिवस झाले ना तिचा फोन ना मॅसेज. म्हणून म्हटले आज तिला घरीच गाठते. तर हे सगळे बघून डोक्याचा पार भुगा झालाय. म्हणजे नक्की काय झालंय रिमाला मला कोणी काही सांगेल का?"

काकूंनी आतापर्यंतची सगळी हकीकत निशाला सांगायला सुरुवात केली.

"अग काही दिवसांपूर्वी रीमाच्या ऑफिसची पिकनिक लोणावळयाला गेली होती. एका दिवसाचा स्टे पण होणार होता म्हणून तिने आमची परवानगी घेतली आणि आम्हीही तिला जायला होकार दिला. ती दुसऱ्या दिवशी संध्याकाळी परत आली सुद्धा. पण तेव्हापासून नुसती शांत. काहीच बोलत नव्हती. अगदी जेवली ही नाही. मला वाटले प्रवासाने थकली असेल म्हणून मी पण तिला काही विचारले नाही. दुसऱ्यादिवशी मी तिला उठवायला तिच्या बेडरूममध्ये गेली. तर ती बेडवर नव्हतीच मुळी. मला वाटले बाथरूम मध्ये असेल. पण तिथेही नव्हती. सगळे घर धुंडाळले. कुठेच नाही. इतक्यात आपला बंटी जोरात किंचाळला म्हणून मी आणि रिमाचे बाबा धावतच आवाजाच्या दिशेने गेलो बघतो तर काय!!

रीमा वरती छताला चिकटलेली होती आणि विक्षिप्त पणे हसत होती. ते पाहून तर बंटी थरथर कापत होता.. आमची पण बोबडी वळाली. बंटीचा आवाज ऐकून शेजारचे पण सगळे धावून आले. त्यादिवशीचा सगळा प्रकार खूपच भयानक होता. आठवला तरी अंगावर काटा येतो बघ!

अगदी तेव्हापासून रोज हाच प्रकार घडतोय. सगळे डॉक्टर झाले. वैद्य झाले. अंगारे-धुपारे झाले. थोडा वेळ ती शांत व्हायची. एकदम नॉर्मल वाटायची. पण पुन्हा काही वेळाने परत तेच सुरू व्हायचे. बंटीने या सगळया प्रकरणाचा खूपच धसका घेतला म्हणून त्याला निलू मावशीकडे पाठलंय पुण्याला. निशा बाळा कळतच नाहीये ग काय करू ते."

असे म्हणून ती रडू लागली.

निशाने एकवार रिमाकडे बघितले. ती शांत झोपली होती. निशाने काकूंकडे रीमाच्या ऑफिस च्या मित्र-मैत्रिणींचे फोन नंबर मागितले. काकूंनी रिमाचा फोनच तिच्या हाती दिला. तो स्वीच ऑफ होता. निशाने तो ऑन केला आणि तिच्या व्हाट्सएप वरच्या तिच्या ऑफिस ग्रुप मधले नंबर स्वतःच्या मोबाईल वर फॉरवर्ड करून घेतले आणि ती तिथून तडक निघाली.

निशाला जाणून घ्यायचे होते की नक्की असे काय झाले त्या दिवशी पिकनिकमध्ये ज्यामुळे रिमाची ही अवस्था झाली. रीमा तिची फार जिवलग मैत्रीण आणि तिला ह्या अवस्थेत पाहून निशाला फार त्रास होत होता आणि एकंदरीत हा प्रकार भयंकर पण वाटत होता.

सकाळी मॉर्निंग वॉक ला जाताना बऱ्याच वेळा रीमा निशाला तिच्या ऑफिस च्या गमतीजमती सांगत असे. त्यामध्ये अनिल, नितीन, स्नेहा, रजत, अनिता यांची नावे सारखीच असतं. त्यांचा खूप छान ग्रुप जमला होता. असेही रीमा नेहमीच म्हणत असे. परंतु, ऑफिस पिकनिक ते पण लोणावळा इथे.. याबद्दल रीमाने निशाला कधी काही सांगितलेले तिला आठवत नव्हते.

निशाने त्या पाचही जणांना फोन करून तिच्या घरी बोलवायचे ठरवले. त्याप्रमाणे तिने सगळयांना फोन ही केले. आधी काहींनी नाही जमणार, वेळ नाहीये आणि अशी बरीच कारणे दिली. पण मग निशाने रीमाच्या अवस्थेबद्दल सगळयांना सांगितल्यावर सगळे एकदा भेटण्यास तयार झाले.

निशा नुकतीच संध्याकाळी रिमाला बघून घरी आली होती. इतक्यात तिची डोअरबेल वाजली. तीने दार उघडताच चार जण तिच्या दरवाजात उभे होते. निशाने त्यांना आत बोलावले. सगळेच चेहऱ्याने थोडे टेन्स दिसत होते. तिने सगळयांशी ओळख करून घेतली. अनिल, नितीन, स्नेहा आणि अनिता. पण रजतला थोडे आऊटडोअर काम असल्यामुळे त्याला ५-१० मिनिटे उशीर होणार होता असे समजले.

ती सगळयांशी बोलणार इतक्यातच रजतची एन्ट्री झाली. ती त्याला बघतच राहिली. रजत दिसायला खूपच देखणा होता. इतका की बघताच क्षणी कोणीही त्याच्या प्रेमात पडेल. बिलकुल तसाच जसा रिमाने निशाला वर्णन केलेलं. रिमाला तो खूप आवडायचा आणि कदाचित रिमाही त्याला आवडत असावी. असो, निशा एकदम भानावर आली आणि त्यालाही तिने बसायला सांगितले.

निशाने रिमा पिकनिक वरून आल्यापासून झालेला सगळा प्रकार त्या सगळयांना सांगितला. हे ऐकून सगळेच शॉक झाले. कारण त्यांना ह्या सगळयाची काहीच कल्पना नव्हती.

निशा म्हणाली, 'तुम्हाला खरंतर मी सांगितलेल कितपत पटलं आहे कोणास ठाऊक. पण मी जे काही तुम्हाला सांगितले ते सर्व खरं आहे. ते मी स्वतःच्या डोळयांनी बघितलंय. मला काल काकूंकडून कळले की पिकनिक वरून आल्यापासून रीमा अशी विचित्र वागत आहे. म्हणून मी तुम्हा सर्वांना इथे बोलावले आहे. तुम्ही ५ जण रिमाच्या ऑफिसमध्ये तिच्या अगदी जवळचे होता. तुम्हीच मला त्या दिवशी काय झाले हे सांगू शकता. प्लीज मला कोणीतरी सांगा. नक्की

काय घडलेल त्यादिवशी ते? मला रिमाची हालत बघवत नाहीये. आता तुम्हीच माझी मदत करू शकता.' असे बोलून ती चक्क रडू लागली.

सगळे वातावरण खूपच गंभीर झालं. स्नेहा आणि अनिताने निशाला धीर दिला. इतक्यात रजत ने बोलायला सुरुवात केली. तो म्हणाला, "खरं तर ही ऑफिसची पिकनिक नव्हती. मला रीमा खूप आवडायची. कदाचित मी ही तिला.. माहीत नाही.. पण मला असं वाटायचं..

म्हणून मला तिला प्रोपोज करायचे होतं पण एका शांत ठिकाणी. आमच्या ग्रुप मध्ये मी अनिलच्या सगळयात जवळचा आहे. म्हणून मी ही कल्पना त्याला सांगितली तर त्याने पिकनिकचा प्लॅन सुचवला. कारण रीमा एकटी माझ्याबरोबर कुठेच आली नसती. माझ्या काकांचा लोणावळयाला बंगला आहे. म्हणून मीच सगळयांना ही जागा सुचवली. सगळयांनी होकार पण दिला. अगदी रीमाला पण तिच्या घरून मंजुरी मिळाली. मी खूप खुश होतो. सगळे मी ठरवल्याप्रमाणे होत होते.

मग आम्ही सगळे लोणावळयाला जायला निघालो. पोहोचेपर्यंत दुपार झालेली. तिथे आजुबाजूला खाण्याची काहीच सोय नसल्यामुळे आम्ही खायचे सामान सुद्धा बरोबर नेले होते. खूपच सुंदर बंगला होता तो. जास्त मोठा नाही पण खाली २ खोल्या, बैठकीची खोली आणि स्वयंपाकघर आणि वरती पण २ खोल्या आणि एक अडगळीची खोली. समोर मोठे गार्डन.

मला तर गेल्यापासून सगळंच रोमँटिक वाटत होतं. सगळे खूप खुश झाले बंगला बघून. पण का कोणास ठाऊक रिमाला तिथे गेल्यापासून नकारात्मक भावना येत होत्या. तिने आम्हाला हे बोलून पण दाखवले. पण कोणीच तिच्याकडे लक्ष दिले नाही. ती तिकडे थांबायला ही तयार

नव्हती. आपण इथून जाऊया लवकर हेच तिचे चाललेलं. मी तिला समजवल्यावर ती एक रात्र थांबायला तयार झाली.

मग आम्ही पूर्ण दिवस खूप मजा केली. सगळ्यांनी पूर्ण रात्र जागवायची असे ठरले. कोणीच झोपले नाही. फक्त रीमा सोडली तर.. कारण सकाळपासून तीची तब्बेत बरी नव्हती.

म्हणून स्नेहा तिला वरच्या खोली मध्ये सोडून आली. नंतर दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही परत निघालो. त्यामुळे माझा प्रोपोज करण्याचा प्लॅन पूर्ण फिस्कटला.

असो, नंतर २-३ दिवस रीमा ऑफिसला आलीच नाही. तिचा फोन पण स्वीच ऑफ होता. मी खूपच उदास झालेलो. मग अचानक एकेदिवशी तिच्या आईचा ऑफिस मध्ये फोन आला की, ती पुण्याला शिफ्ट झालीये आणि तिला तिथे नवीन जॉब मिळाला आहे म्हणून. मग तेव्हापासून ती कोणाच्याच कॉन्टॅक्ट मध्ये नव्हती. आज तुझा फोन आला आणि रिमाचं नाव एकूण मी चकितच झालो आणि काळजीही वाटली. म्हणून तडक इथे निघून आलो."

बाकी सगळ्यांनी ही रजत च्या बोलण्याला संमति दिली. तरीही निशाचे समाधान होत नव्हते. तिला सारखे वाटतं होते, नक्कीच अकल्पित असे काहीतरी तिथे घडलंय. तिने रजतला विनंती केली की, मला तो बंगला बघायचाय.

रजत निशाला त्या बंगल्यात न्यायला तयार झाला. आपण येत्या दोन दिवसात निघुयात असे बोलून रजत आणि बाकी सगळे निघाले.

बाहेर आल्यावर अचानक स्नेहा म्हणाली, 'अरे यार, मी माझी पर्स निशाच्या घरातच विसरली. तुम्ही पुढे व्हा मी आलेच.'

निशाच्या घराचा दरवाजा उघडाच होता.

तिने हाक मारली, 'निशा.'

निशा हॉलमध्येच होती.

'अरे स्नेहा, काय झाले काही विसरलीस का?' निशा म्हणाली.

'हो, माझी पर्स विसरले होते.. .. .. ही बघ मिळाली.. चल बाय' असे बोलून स्नेहाने सोफ्यावरची पर्स उचलली व ती बाहेर निघणार इतक्यात ती थांबली आणि निशाला म्हणाली,"निशा मला तुला काही सांगायचंय, रिमाबद्दल. खर तर मगाशीच सांगणार होते. पण सगळयांनी माझी मस्करी केली असती. कारण तू जे काही सांगितलंस ते अजून पण कोणाला पटलं नाहीये. कारण सगळेच या गोष्टीवर विश्वास ठेवतात असे नाही.'

ती पुढे म्हणाली, 'पिकनिकच्या दिवशी लोणावळयाच्या त्या घरात गेल्यापासूनच रीमा खूप अस्वस्थ होती. रात्री आमची सगळयांची मस्ती चालली होती. पण रिमाचं लक्षच नव्हते. तिने सगळयांना बरं वाटत नाहीये. डोके दुखतंय अस सांगितले. मग मीच तिला वरच्या रूम मध्ये घेऊन गेले. रीमा कशाला तरी घाबरत होती. तिने मला तिला झोप लागेपर्यंत तिथेच बसायला सांगितले. म्हणून मी तिथेच बसून होते. तेवढ्यात अनिलने मला हाक मारली आणि रिमाचा डोळा ही लागलेला म्हणून मी खाली गेले. पण मोबाइल तिथेच राहिला म्हणून परत आले, मी फोन घेतला आणि बघते तर रीमा खोलीमध्ये नव्हती. मला वाटले बाथरूमला गेली असेल.

पण ती तिथेही नव्हती कारण बाथरूमचा दरवाजा तर उघडा होता. मला क्षणभर वाटले माझ्या पाठीमागे कोणीतरी उभे आहे. मी वळून बघितले तर कोणचं नव्हते. इतक्यात कसला तरी आवाज आला म्हणून मी खोलीच्या दरवाजाकडे गेले तर रीमा मला अडगळीच्या खोलीत जाताना दिसली. मी तिला हाक पण मारली पण  तेवढ्यात तो दरवाजा बंद झाला. मी

तो उघडला आणि आत गेले तर आत रीमा नव्हती. इतक्यात माझा लक्ष त्या खोलीच्या दरवाजाकडे गेला तर रीमा तिथे उभी होती.. खरं तर ती रीमा नव्हतीच ती रिमाचा चेहऱ्यात दुसरीच कोणीतरी होती. तिचे केस मोकळे होते, डोळयांची बुबुळे एकदम सफेद आणि ती विचित्रपणे हसत होती. नशीब तेवढ्यात रजत तिथे आला. त्याने मला जोरात हाक मारली. खाली येण्यासाठी. आणि मग मी बघते तर समोर कोणचं नव्हते. मी रीमाच्या खोलीत होते आणि ती तर पलंगावर शांत झोपली होती मग मी जे काही पाहिले ते काय होते? मला काहीच समजले नाही. पण मनातून मी खूपच घाबरले होते. नंतर मी पूर्ण रात्र खालीच होते आणि मला आलेला अनुभव मी कोणालाच नाही सांगितला. कारण कोणीच विश्वास ठेवला नसता' ,इतके बोलून ती निघून गेली.

निशा विचार करत होती. या सगळयांचे मूळ त्या घरातच आहे आणि हे सगळे फक्त रिमालाच जाणवले होते म्हणूनच कदाचित तिला झपाटले असेल. मला तिथे जावंच लागेल पण जाण्याआधी मला गुरुजींना भेटावं लागेल. ह्या वर तेच योग्य उपाय सांगू शकतात.

निशाने गुरुजींच्या मठात फोन केला आणि त्यांच्याशी भेटायची वेळ ठरवली.

शहराच्या एका बाजूला शांत ठिकाणी गुरुजींचा मठ होता.  गुरुजी आणि त्यांचे काही अनुयायी तिथे राहत. गुरुजी नेहमी पांढरे वस्त्र परीधान करत असतं. त्याचे रूप अत्यंत तेजस्वी होते. ते दिवसभर ध्यानधारणेत मग्न असत. त्यांनी ध्यानधारणेतून प्रचंड सामर्थ्य प्राप्त केले होते. ते रोज मोजक्याच लोकांना भेटत असतं. जर एखाद्याची बाब जास्त गंभीर असेल तरच ते स्वतः जातीने लक्ष घालत. नाहीतर ते त्यांच्या सल्ल्याने किंवा उपदेशाने त्यांच्याकडे येत असलेल्या लोकांच्या समस्यांचे निवारण करत आणि ह्या सगळ्याचे ते पैसेही घेत नसतं. निशा काहीही मोठा

निर्णय घेताना गुरुजींचा सल्ला जरूर घेत असे आणि आज तिला गुरुजींशी भेटणे फारच महत्वाचे होते. कारण आजची बाब फारच गंभीर होती.

निशा तिला दिलेल्या वेळेवर मठात पोहोचली. तिथले वातावरण इतके सकारात्मक होते की, क्षणभर ती सगळेकाही विसरली.

इतक्यात गुरुजी आले. त्यांनी तिला येण्याचे कारण विचारले. निशाने आतापर्यंत घडलेले सर्वकाही त्यांना सांगितले आणि 'आपल्याला लवकरात लवकर काहीतरी करायला पाहिजे' असेही ती म्हणाली.

गुरुजींनी सर्वात प्रथम रिमाची भेट घ्यायचे ठरवले आणि नंतरच त्या बंगल्याची शहानिशा करण्याचे ठरवले. त्यांना निशाच्या एकंदरीत बोलण्यावरून येणाऱ्या संकटाची थोडीफार कल्पना आली होती. त्याप्रमाणे त्यांनी तयारी केली.

निशा आणि गुरुजी दोघेही रिमाच्या घराजवळ पोहोचले. रजतला ही रिमाने तिथेच बोलवून घेतले. रिमामध्ये जे काही होते त्याला गुरुजी इथे आलेले नको होते म्हणून तिने घरात तांडव सुरू केला. सगळया वस्तू इकडेतिकडे आपटत होत्या. रिमाचा आई-वडील घाबरून खोलीबाहेरच उभे होते. आत जायची कोणालाच हिम्मत नव्हती. इतक्यात गुरुजी तिथे पोहोचले. त्यांनी प्रथम सर्व घरामध्ये नजर फिरवली. मग ते रिमाचा खोलीत गेले.

रीमा जोरजोरात घोगऱ्या आवाजात ओरडत होती,' तू कशाला आला आहेस इथे? निघून जा.. निघून जा.. मी हिला सोडणार नाही.. घेऊन जाणार.. घेऊन जाणार.. ' आणि जोरजोरात हसायला लागली.

गुरुजींनी सगळयांना बाहेर जाण्यास सांगितले. त्यांनी रिमाच्या डोक्यावर हाथ ठेवला आणि तिच्या कपाळाच्या मध्यभागी अंगठा ठेवून काहीतरी मंत्र पुटपुटला. घरातील वातावरण एकदम बदलले. सगळे घर हलू लागले. रीमासुध्दा तडफडू लागली होती. रागाने तिचे डोळे लालबुंद झाले होते. पण गुरुजींनी न डगमगता मंत्र बोलणे चालूच ठेवले. थोड्याच वेळात सर्व काही शांत झाले. रीमा ही शांत झोपली. त्यांनी तिच्या डोक्याला अंगारा लावला. मग गुरुजींनी रिमाच्या आई वडिलांना आत बोलावले आणि त्यांना म्हणाले, 'काही काळजी करू नका. आता मी आलोय. बरं झालं निशाने योग्यवेळी मला येथे आणले नाहीतर अनर्थ झाला असता. असो, आता सध्यातरी घाबरण्याचे काही कारण नाही. सर्व ठीक आहे. हा अंगारा तिच्या पलंगाखाली ठेवा. मी याचा कायमचा सोक्षमोक्ष लावायला लवकरच परत येईन' असे बोलून गुरुजी, निशा आणि रजत लोणावळयाला निघाले.

रजतच्या काकांच्या बंगल्यावर.

त्या तिघांना पोहचेपर्यंत संध्याकाळ झाली. बंगल्यात जायच्या आधी गुरुजी पूर्ण बंगल्याच्या आवारात फिरले. त्यांना कोणीतरी बंगल्याच्या आतून बघत आहे असा भास झाला. पण खरोखरच बंगल्याच्या खिडकीत कोणीतरी होते. गुरुजी जे समजायचे ते समजून गेले. कारण त्यांना ह्या सगळयाची थोडी फार पूर्व कल्पना होती. त्यांनी सगळयांनी एक एक खोली

तपासायला सुरुवात केली. पण कोणालाच काही जाणवले नाही. इतक्यात निशाला स्नेहा ने सांगितलेला अनुभव आठवला. तिने तो गुरुजींना सांगितला.

सगळे अडगळीच्या खोलीकडे वळाले. त्या खोलीत थोडेफार सामान होते पण पूर्ण खोली धुळीने माखली होती. सगळयांनी तिथे शोधाशोध करायला सुरुवात केली. इतक्यात निशाला एक जुना फोटो मिळाला. तो एका जोडप्याचा फोटो होता. निशाने रजतला विचारले, 'हे तुझे काका काकी ना?'

रजतने फोटो बघताक्षणी नाही म्हटले.

'मग हे कोण असतील?' निशाने विचारले.

'मला काकांना विचारावे लागेल' रजत उत्तरला.

इतक्यात बाहेर कसलातरी जोरदार आवाज झाला. सगळे दरवाजाकडे निघाले. पण निशा कशाला तरी अडकून खाली  पडली आणि दरवाजा बंद झाला. रजत आणि गुरुजी दोघेही दरवाजा उघडण्याचा प्रयत्न करत होते. तर इथे खोलीमध्ये निशा खूपच घाबरून गेली होती. तिने दरवाजा उघडण्याचा खूपच प्रयत्न केला पण काही केल्या तो उघडतच नव्हता.

इतक्यात तिला कोणीतरी मागे उभे असल्याचा भास झाला. तिने मागे वळून पाहिले तर ती जोरात किंचाळली. कारण तिच्या समोर रीमा उभी होती पण ती रीमा नव्हतीच. जसे स्नेहाने वर्णन केले अगदी तशीच. ती तिच्याजवळ येणार इतक्यात दरवाजा उघडला. गुरुजींनी अगदी खेचतच निशाला बाहेर काढले आणि तो दरवाजा बंद केला. तसेच त्या खोलीच्या दरवाजाला त्यांनी मंत्रांनी सिद्ध केलेला धागा बांधला.

निशा थरथरत कापत होती. आता तिथे थांबणे शक्य नव्हते. गुरुजींनी निशाच्या डोक्यावर हाथ ठेवून तिला शांत केले आणि ते म्हणाले, 'आपल्याला इथे परत यावे लागेल पण आता रिमाला घेऊनच. ही बाब सोपी नाही. नक्कीच काहीतरी अकल्पित असे इथे घडलंय. मला योग्य तयारी करूनच इथे यावे लागेल. तोपर्यंत तुम्ही ह्या फोटोमधल्या व्यक्ती कोण आहेत हे शोधा आणि मला उद्या मठात येऊन भेटा.नक्कीच या व्यक्तींचा काहीतरी संबंध ह्या घटनेशी जरूर आहे. सध्यातरी रिमाला काही धोका नाही. चला मग भेटू उद्या.' असे बोलून रजत ने गुरुजींना मठात आणि निशाला तिच्या घरी सोडले.

दुसऱ्या दिवशी सकाळीच रजत आणि निशा भेटले. दोघेही रजतच्या काकांच्या राहत्या घरी पुण्याला गेले. रजतने आधीच काकांना तो आणि निशा घरी भेटायला येण्याची कल्पना दिली होती. निशा काकांचे घरावरचे नाव 'जयराम सरपोतदार' वाचताच भारावून गेली. काकांनी दोघांचे स्वागत केले.

औपचारिक ओळख झाल्यानंतर काकांनी दोघांना येण्याचे कारण विचारले. तेव्हा निशाने आतापर्यंत घडलेली सगळी हकीकत काकांना सांगायला सुरवात केली. हे सगळं ऐकताना काकांचा चेहऱ्याचे भाव बदलले.

नंतर रजतने काकांना लोणावळयाच्या बंगल्यात मिळालेला फोटो दाखवला. काकांचा तो फोटो बघताच चेहऱ्यावरचा रंगच उडाला.

हे निशाने टिपले.

'काका, तुम्ही ह्या दोघांना ओळखता का? हे कोण आहेत? तुम्हाला याबाबत काही माहीत आहे का?', निशा म्हणाली.

यावर काकांनी उडवाउडवीची उत्तरे द्यायला सुरुवात केली. मला नाही माहीत. मी यांना ओळखत नाही. अशी अनेक.

निशाला काकांच वागणं थोडं खटकलं. पण तिने ते चेहऱ्यावर दाखवू दिले नाही. ती दोघे काकांचा निरोप घेऊन निघाली.

'रजत मला वाटतं की, काकांना त्या बंगल्याबद्दल नक्कीच काहीतरी माहीत आहे. पण ते सांगत नाही आहेत. कुठेतरी नक्की पाणी मुरतंय.' निशा म्हणाली.

'हे बघ निशा, काका कशाला खोटं बोलतील किंवा लपवतील. त्यांना काय मिळणार हे सगळं करून. तसं पण तो बंगला त्यांचा आहे हे विसरून चालणार नाही. त्यांना जर हे कळलं की, आपण त्यांच्याबद्दल असा विचार करतोय तर ते आपल्याला त्या बंगल्यात पण जायला देणार नाहीत. हे लक्षात ठेव', रजत म्हणाला.

'मला माहित आहे, तरीपण.. .. .. असो, चल आपल्याला गुरुजींना भेटायला जायचंय. त्यांना हे सगळं सांगायला हवं. आता यावर तेच मार्ग काढतील.' असे म्हणून निशा आणि रजत गुरुजींच्या मठात जायला निघाले.

गुरुजी त्यांचीच वाट बघत होते. रजत पहिल्यांदाच गुरुजींच्या मठात येत होता. तिकडचे शांत, प्रसन्न वातावरण त्याला खूपच आवडले. तो त्या वातावरणाशी एकरूप झाला. तो सगळं काही विसरला. इतक्यात तिथे गुरुजी आले आणि रजत भानावर आला. निशाने गुरुजींना रजतच्या काकांच्या भेटीबद्दल सांगितले. गुरुजी जे समजायचं ते समजले. त्यांना आता रिमाला तिथे नेण्यावाचून काहीच उपाय दिसत नव्हता.

त्यांनी रजत आणि निशाला आपण आज रात्री रिमाला तिथे घेऊन जाऊया असे सुचविले आणि ह्या प्रकरणाचा छडा लावू असे निशाला आश्वासन दिले. त्यासाठी त्यांनी एक धागा रिमाच्या दंडावर बांधावयास दिला आणि रजत आणि निशाला ही त्यांनी मंत्र सिद्धीने धागा बांधला. रिमाला सुरक्षितपणे बंगल्यावर आणण्यासाठी गुरुजींनी रजत आणि निशाला ही सुरक्षित केले होते.त्यांना माहीत होते की, ती जी कोणी आहे ती रिमामध्ये परत नक्कीच प्रवेश करेल. म्हणून त्यांनी तात्पुरता उपाय करून रिमाला सुरक्षित केले होते. पण तिचा कायमचा बंदोबस्त करणे खूपच जरुरी होते. त्यासाठी त्यांनी आजची रात्र निवडली होती. त्याप्रमाणे त्यांनी तयारी करायला ही सुरुवात केली आणि ते ध्यानधारणेत मग्न झाले. कारण तिचं ऊर्जा त्यांना कामी येणार होती.

गुरुजींनी सांगितल्याप्रमाणे रजत आणि निशा रात्री रिमाच्या घरी पोहोचले. निशाने लगेच तिच्या दंडावर गुरुजींनी दिलेला धागा बांधला व तिला घेऊन ते बंगल्यावर जायला निघाले. निशाला गुरुजींवर पूर्ण विश्वास होता.

इथे गुरुजी ते तिघे यायच्या आधीच बंगल्यावर पोहोचले. त्यांनी बंगल्यात प्रवेश करण्याआधी त्या बंगल्याभोवती सुरक्षा कवच बनविण्यास सुरुवात केली. त्यांनी त्यांच्या जवळची उदी घेऊन ती मंत्रोच्चाराने बंगल्याच्या बाहेरील प्रत्येक कोपऱ्यात ठेवायला सुरुवात केली. हे काम इतके सोपे नव्हते. जसे त्यांनी पहिली उदी ठेवली. तर अचानक सोसाट्याचा वारा वाहू लागला. वारा काय वादळच होते ते. घराच्या आतून वेगवेगळे आवाज येऊ लागले. पण त्यांनी त्याला न जुमानता पूर्णपणे दुर्लक्ष केलं. त्यांनी आपलं काम सुरूच ठेवलं. काही वेळानंतर एक पूर्ण फेरा झाल्यावर ते परत येऊन दरवाजात उभे राहिले.

इतक्यात रजत, निशा आणि रीमा तिथे आले. रीमा अजूनही पूर्ण शुद्धीत नव्हती. पण तिला इथे आणणे भागच होते. गुरुजींनी आत जाण्याआधी सर्वांना सूचना केली की, त्यांना दिलेल्या धाग्याचा प्रभाव इथपर्यंतच होता. आत काहीही होऊ शकते. पण माझ्यावर विश्वास ठेवा. मी असेपर्यंत तुम्हाला कसलाही धोका नाही. पण तरीही तुम्हा सर्वांना सावध राहावे लागेल. असे बोलत बोलत त्यांनी बंगल्यात प्रवेश केला.

रजतने दिवे लावण्याचा प्रयत्न केला पण दिवे लागलेच नाही. इतका काळाकुट्ट अंधार होता की, समोरचे काहीच दिसत नव्हते. गुरुजींना याची कल्पना आधीच होती. त्यांनी स्वतः जवळची मेणबत्ती पेटविली आणि अजून २ मेणबत्या पेटवून त्यांनी रजत आणि निशाला दिल्या. घरात बऱ्यापैकी उजेड झाला होता.

पण रीमा.. ती तर तिथे नव्हतीच.. .. ती अचानक कुठे गायब झाली?

निशा जोरजोरात हाका मारू लागली. 'रीमा.. .रीमा तू कुठे आहेस?'

इतक्यात जोराचा किंचाळण्याचा आवाज आला. तो रिमाचा होता. रजत आणि निशा आवाजाच्या दिशेने निघणार इतक्यात गुरुजींनी त्यांना थांबविले. गुरुजींनी एकदा घरभर नजर फिरवली. तो आवाज अडगळीच्या खोलीतून आला होता. त्या आत्म्याने रिमाला पुन्हा वश केले होते. तो दरवाजा उघडण्यासाठी.

गुरुजींनी मंत्रोच्चाराने एक मोठं वर्तुळ आखले आणि त्यामध्ये रजत आणि निशाला बसावयास सांगितले आणि ते म्हणाले, 'मी आता इथे त्या आत्म्याला बोलावणार आहे. तेव्हाच आपल्याला तिचा इथे असण्याचा आणि रिमाला वश करण्याचा उद्देश समजेल. तोपर्यंत तुम्ही ह्या वर्तुळातून बाहेर येऊ नये. या वर्तुळात तुम्ही पूर्णपणे सुरक्षित आहात. बाहेर काहीही झालं तरी तुम्ही लक्ष देऊ नका. कदाचित रीमा दिसेल किंवा अजून काही गोष्टी तुम्हाला ह्या वर्तुळातून बाहेर यायला विवश करतील.. पण तुम्ही स्वतःवर संयम ठेवा.'

असे बोलून गुरुजींनी मंत्रोच्चाराला सुरवात केली. त्याबरोबर वातावरण बदलू लागले. अचानक वीजा कडकडण्याचा आवाज झाला. जणू घरातच वादळ सुरू झालं होत. एखाद्याच्या मनाविरुद्ध घडत असेल असं वातावरण निर्माण झालं. घरातील सगळया वस्तू इकडे तिकडे फेकल्या जात होत्या. तरी गुरुजी न थांबता मंत्र बोलतच होते.. त्यांनी एक, दोन आणि जेव्हा तिसरी आहुती टाकली तेव्हा रीमा त्यांच्यासमोर येऊन उभी राहिली. पण ती रीमा नव्हती. ती तीच होती जी निशाला अडगळीच्या खोलीत दिसली होती. फक्त ती रीमाच्या शरीराचा वापर करत होती. तिला परत पाहून निशा जोरात किंचाळली.

आता रीमा अगदी गुरुजींच्या समोर उभी होती. मोकळे केस, विद्रुप चेहरा, पांढरी बुबुळे ती घोगऱ्या आवाजात विचारात होती,'मला का बोलावलयस. तू काहीही कर मी हिला सोडणार नाही. घेऊनच जाणार आणि ती विचित्र पणे हसायला लागली.'

गुरुजींनी पुन्हा आहुती दिली. तसा तिला त्रास होऊ लागला. ती किंचाळू लागली. गुरुजी म्हणाले,'बोल कोण आहेस तू? का ह्या निष्पाप जीवाशी खेळतेयस. काय बिघडलं आहे तिने तुझं. सांग नाहीतर माझ्याशिवाय वाईट कोणी नाही.' असे बोलून ते पुन्हा आहुती देणार.. .

इतक्यात ती बोलू लागली,'सांगते.. . सांगते.. .. सगळं सांगते. माझं नाव रमा. हा बंगला माझाच होता. मी आणि माझा नवरा माधव. आम्ही दोघे खूप खुश होतो इथे. पण तो नीच जयराम सरपोतदार आमच्या आयुष्यात आला आणि त्याने आमच्या आयुष्याची राखरांगोळी केली.'

हे नाव ऐकताच निशा आणि रजत एकमेकांकडे बघू लागले.

ती पुढे बोलू लागली,'तो माझ्या नवऱ्याचा शाळेतला मित्र म्हणून त्याच्यावर माधवने खूप विश्वास ठेवला. पण त्याने माधवला व्यसनाधीन केले आणि त्यामुळे माधवचं कामातून लक्ष उडालं आणि तो दिवाळखोर झाला. आमचं सगळं वैभव देऊन पण तोटा भरून येणार नव्हता म्हणून माधवने हा बंगला जयराम कडे गहाण ठेवला.. पण तोटा खूपच जास्त होता म्हणून माझा माधव हा धक्का सहन करू शकला नाही आणि तो हृदयविकाराच्या झटक्याने मरण पावला. एका

झटक्यात माझं विश्व बदललं. याचा फायदा जयरामने पूर्णपणे घेतला. त्याने मला खोटं सांत्वन दाखवून माझा विश्वास संपादन केला आणि तो माझ्या जवळ येण्याचा प्रयत्न करू लागला. त्याचा माझ्यावर डोळा होता. तो माझ्या सौंदर्यावर भाळला होता. मी पण त्याच्या कपटी प्रेमात ओढले गेले. पण मला काय माहीत होतं की, त्याला फक्त माझं शरीर हवं होत. त्यातच मी गरोदर राहिले आणि म्हणून मी त्याच्यापाठी लग्नाचा तगादा सुरू केला. आज नको उद्या असं करता करता खूप दिवस गेले. एक दिवस अचानक त्याने माझ्या गळयात मंगळसूत्र घालून माझ्याशी लग्न केल्याचं नाटक केलं. मी इतकी खुश होते की, मी ह्यात पूर्णपणे फसले. मग त्याने सराईतपणे माझ्या जेवणात विष टाकून माझा आणि माझ्या होणाऱ्या बाळाचा जीव घेतला व अडगळीच्या खोलीच्या भिंतीत मला पुरून टाकले आणि त्यांनतर तो या घराकडे फिरकलाही नाही म्हणून इतके वर्ष माझा आत्मा न्याय मिळवण्यासाठी या घरात तडफडत होता. पण आता जोपर्यंत मी माझा बदला घेणार नाही तोपर्यंत मी हिला सोडणार नाही. मी हिला घेऊनच जाणार' असे बोलून ती विचित्रपणे हसायला लागली.

तिच्या हसण्याने सारं घर दुमदुमून गेलं आणि अचानक सगळया मेणबत्त्या विजल्या आणि बंगल्यात पुन्हा काळाकुट्ट अंधार झाला. जेव्हा गुरुजींनी पुन्हा मेणबत्ती पेटवली तर रीमा कुठेच नव्हती. इतक्यात गुरुजींना ती अडगळीच्या खोलीत जाताना दिसली आणि त्या खोलीचा दरवाजा बंद झाला.

इथे रजतला विश्वासच बसत नव्हता की, त्याचे काका खून करू शकतात. गुरुजींनी रजतचे सांत्वन केले. आणि रिमाला वाचविण्यासाठी काकांना इथे बोलावून रमाला न्याय देने जरुरी होते. तेव्हाच रीमा वाचू शकत होती. गुरुजींचे ऐकून रजतने लगेच काकांना फोन लावला

आणि 'मला वाचवा. मी इथे अडकलोय' असे खोटं बोलून त्यांना लोणावळयाच्या बंगल्यावर यायला भाग पाडले. रजत संकटात आहे हे कळल्यावर काका लगेच निघाले.

काका थोड्याच वेळात बंगल्यावर पोहोचले. जसा त्यांनी बंगल्याच्या आत प्रवेश केला. अचानक घराचे वातावरण बदलले. अडगळीच्या खोलीचा दरवाजा उघडला आणि काही समजायच्या आत रिमाने काकांचा गळा पकडला. काका ह्या अचानकच्या हल्ल्याने पुरते घाबरले. रिमाने त्यांना गरागरा फिरवून खाली पाडले. काका बोलत होते, 'तू कोण आहेस? काय पाहिजे तुला? मला सोड. मला सोड.'

पण ती ऐकायला ही तयार नव्हती. उलट ती तिच्या मूळ रुपात आली. काकांच्या तोंडून अचानक निघाले 'रमा!!!!'

रमा बोलू लागली,'हो मीच जिचा तू गोड बोलुन काटा काढलास. माझ्या पोटातल्या जीवाचा ही विचार केला नाहीस आणि मला या घरात पुरून तडफडत ठेवलेस. आज तुला मारूनच मला मुक्ती मिळेल. मी तुला सोडणार नाही.'

असे बोलताच काकांनी सगळं कबुल केलं आणि त्याच्यासाठी हवी ती शिक्षा ही ते भोगायला तयार झाले. तरीही रमा त्यांना सोडायला तयार नव्हती आणि ती काकांवर वार करणार.

इतक्यात गुरुजींनी आहुती देऊन रमाला शांत केले.

आणि ते म्हणाले, 'थांब रमा. तू हा गुन्हा करू नकोस. जर तू जयरामला मारलेस. तर ह्या निष्पाप मुलीला शिक्षा होईल. मी तुला वचन देतो की, जयरामला त्याच्या कृत्याची शिक्षा जरूर मिळेल आणि मी तुलाही मुक्ती मिळवून देईन.'

इतक्यात रजतने पोलिसांना फोन करून बोलविले आणि काकांच्या कबुली जवाबनुसार अडगळीच्या खोलीतून रमाचा सांगडा काढण्यात आला व काकांना अटक झाली.

गुरुजींनी रमाच्या सांगाड्याला विधिवत अग्नी देताच इथे रीमा बेशुध्द झाली व रमाला मुक्ती मिळाली आणि थोड्याच दिवसात रीमा पूर्णपणे बरी झाली.

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची तेरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद

यांची सात, अविनाश नगरकर यांची,डॉ. स्मिता दामले यांची पाच, डॉ. वृषाली जोशी यांची तीन अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, सूरज गाताडे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत

अध्यक्ष, ई साहित्य प्रतिष्ठान